# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक:- ८६-२३ दिनांक :- १६/०३/२०२३

## अंमली पदार्थाची विक्री करणा-या आरोपीतांवर कारवाई करुन ११,१९,०००/- रुपये किंमतीचे अंमली पदार्थ जप्त - गुन्हे शाखा कक्ष ३, विरार यांची कामगिरी.

-----000----

मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात अंमली पदार्थ विक्री करणा-या इसमांविरुध्द कारवाई करणेबाबत वरिष्ठांकडुन सुचना व मार्गदर्शन करण्यात आले होते.

वरिष्ठांच्या मार्गदर्शन व सुचनेप्रमाणे गुन्हे शाखा कक्ष-३, विरार चे अधिकारी व अंमलदार यांनी गोपनीय बातमीदारांकरवी प्राप्त माहितीच्या अधारे कायदेशीर बाबींची पुर्तता करुन दिनांक १५/०३/२०२३ रोजी २१.०५ वाजता जि. पालघर, ता. वसई, नालासोपारा पुर्व, वसई नालासोपारा लिंक रोड, चंदननाका जवळ रोडवर आरोपीत नामे तौसिब युसुफ पटेल, वय ३८ वर्षे, रा. वसई पश्चिम, ता. वसई, जि. पालघर याची अंगझडती घेतली असता त्याचे कब्जात ५० ग्रॅम वजनाचे १०,००,०००/- रुपये किंमतीचे मेफेड्रॉन (M.D) हा अंमली पदार्थ तसेच आरोपीत नामे मेहंदी मोहम्मद अली शिरजी, वय ४१ वर्षे, रा. वसई पश्चिम, ता. वसई, जि. पालघर. याची अंगझडती घेतली असता त्याचे कब्जात ८ ग्रॅम वजनाचे ६४,०००/- रुपये किंमतीचा चरस असा एकुण ११,१९,०००/- रुपयांचा अंमलीपदार्थ मिळुन आल्याने तो जप्त करणयात आला आहे. सदर आरोपीतांविरुध्द आचोळे पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नंबर १६१/ २०२३ एन. डी. पी. एस. अधिनियम कलम ८ (क), २१ (क), २० (ब), ॥ (क), २९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास आचोळे पोलीस ठाणे करीता आहे.

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. श्री. शाहुराज रणवरे, गुन्हे शाखा कक्ष-२, वसई, पो.उप.नि. शिवाजी खाडे, उमेश भागवत, पो.हवा. अशोक पाटील, मुकेश तटकरे, शंकर शिंदे, सचिन घेरे, सागर बारावकर, मनोज सकपाळ, अश्विन पाटील, पो.अंम. राकेश पवार, सुमित जाधव, म.सु.ब. प्रविण वानखेडे, सागर सोनवणे, गणेश यादव नेमणुक गुन्हे शाखा कक्ष -३ तसेच स.फौ. संतोष चव्हाण नेम सायबर सेल यांनी केली आहे.

------000-------